# दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि.पंढरपूर जि.सोलापूर

## ११३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना (फक्त सभासदांकरिता)

बँकेचे सर्व सभासदांना कळविणेत येते की, आपले बँकेची ११३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरूवार दि.१४/०८/२०२५ रोजी दुपारी ठिक ५.०० वाजता बँकेचे कर्मयोगी सभागृह, शाखा नवीपेठ, पंढरपूर येथे आयोजित केलेली आहे. या सभेत खालील विषयांवर विचार विनीमय होणार आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे हि विनंती.

### * सभेपुढील विषय *

१. मागील दि.२६/०९/२०२४ रोजी झालेल्या ११२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२. दि.३१/०३/२०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक इत्यादी स्विकारणे व मंजूर करणे. तसेच मा.वैधानिक लेखापरिक्षक यांचेकडून आलेला वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.

३. मा.वैधानिक लेखापरिक्षक यांच्या सन २०२३-२४ सालाच्या दोष दुरूस्ती अहवालाची माहिती घेणे व स्विकृती देणे.

४. मा.संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२४-२५ चे नफ्याच्या विनियोगास मान्यता देणे.

५. सन २०२५-२६ सालाचे बँकेचे उत्पन्न व खर्च यांचे अंदाजपत्रक मंजूर करणे. मागील वर्ष २०२४-२५ मध्ये मंजूर अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे.

६. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षक नेमणूकीबाबत मे.रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे निर्देशानुसार केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे, अनुषंगिक कार्यवाही करणे.

७. समावर्ती/अंतर्गत लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व मानधन ठरविणे.

८. बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची माहिती घेणे.

९. मे.रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे कर्ज व बुडीत कर्जे निर्लेखीत परिपत्रकानुसार बँकेने तयार केलेल्या कर्ज तडजोड योजने अंतर्गत तडजोड केलेल्या थकीत कर्ज खात्यांच्या माहितीची नोंद घेणे.

१०. सन २०२५-२६ साला करीता बाहेरून कर्ज उभारणीची कर्ज मर्यादा ठरविणे.

११. मा.अध्यक्षांचे परवानगीने आयते वेळी येणारे विषयांचा विचार करणे.

पंढरपूर
**दिनांक:** २५/०६/२०२५

मा.संचालक मंडळाचे आदेशावरून,
श्री.उमेश रामचंद्र विरधे
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

---

**विशेष सूचना :**

१) सभेस आवश्यक असलेली गणसंख्या जर दुपारी ५.०० वाजेपर्यंत झाली नाही तर ती सभा तहकूब केली जाईल. अशी तहकूब केलेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी ठिक ५.३० वाजता मुळ सभेच्या विषय पत्रिकेवरील कामकाज पार पाडणेसाठी भरेल. त्यासाठी नियमानुसार गणसंख्या आवश्यक असणार नाही.

२) ९७ व्या घटना दुरूस्तीच्या अनुषंगाने सभासदांसाठी सहकार कायदा कलम २४(अ) अन्वये ''सभासद प्रशिक्षण कार्यक्रम'' त्याच दिवशी त्याच ठिकाणी दु.४.३० वा. आयोजित केलेला आहे. तरी सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून आपली जबाबदारी पार पाडावी.

३) सन २०२४-२५ चा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक इत्यादी आर्थिकपत्रके बँकेचे प्रधान कार्यालय व सर्व शाखा येथे नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेले आहेत. मागणी केल्यास पाहणेसाठी उपलब्ध करून देण्याची व्यवस्था केलेली आहे. ताळेबंद व नफा तोटा पत्रक बँकेच्या www.pandharpurbank.com या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत आला आहे.

४) ज्या सभासदांना बँकेचे कामकाजासंबंधी सभेत प्रश्न विचारावयाचे असतील किंवा सूचना करावयाच्या असतील त्यांनी सोमवार दि.११/०८/२०२५ रोजी दु.५.०० वाजेपर्यंत प्रधान कार्यालय, पंढरपूर यांचेकडे लेखी कळवावे, म्हणजे माहिती देणे शक्य होईल. तद्नंतर आलेल्या प्रश्नांचा सदर सभेमध्ये विचार केला जाणार नाही.

५) सभासदांनी सभेस येताना किमान एक ओळखपत्र घेवून येणे आवश्यक आहे, अन्यथा प्रवेश देता येणार नाही.